# कस्तुरीमृग

सुरेखाताईंनी दुपारचा मस्त चहा केला आणि बाहेरच्या पावसाचा आवाज ऐकत त्या बाहेर बाल्कनीत येऊन बसल्या. संध्याकाळची शुभंकरोती क्लासची मुले आज येणार नव्हती आणि आप्पा पण मित्रांबरोबर पत्ते खेळायला जेवणानंतरच बाहेर पडले होते. त्यामुळे त्या अजूनच निवांत होत्या. तेवढ्यात दारावरची बेल वाजली, इतक्या पावसात कोण आलं असा विचार करतच त्यांनी दार उघडलं. दारात  बिल्डिंगमधली उमा उभी होती. "काकू येऊ का हो आत, आहे का तुम्हाला थोडा वेळ?" उमाने अंदाज घेतच विचारले.

"अगं विचारतेस कसली, ये ना आत" सुरेखाताईंनी हसतहसत तिला हाताला धरूनच घरात आणले. शेजारची उमा म्हणजे अक्षरशः उत्साहाचा धबधबाच!! पण नीट बघितलं तर चेहऱ्यावर थोडं मळभच दाटून आलेलं दिसत होतं. "उमा थोडा चहा घेशील का? माझ्यासाठी करतेच आहे." त्यांनी तिला बोलतं करण्यासाठी विचारलं. तिने मानेनेच नकार दिला. सुरेखाताईंनी उगाच इकडल्या तिकडल्या बातम्या तिखट–मीठ लावून जरा जास्तच उत्साहात सांगितल्या, वाटलं आता तरी जरा कळी खुलेल पण तरीही ती जरा मिटलेलीच वाटली. शेवटी न रहावून सुरेखाताईंनी सरळ विषयालाच हात घातला. "काय गं,सध्या अशी गप्पगप्प का गं असतेस? अगं परवा वरच्या गणपुलेकाकूपण म्हणत होत्या की उमाचं सध्या काहीतरी बिनसलंय का, नेहेमीसारखी हसत बोलत नाही, तब्बेत वगैरे सगळं ठीक आहे ना?" असं म्हणताच उमाचे डोळे गच्च भरून आले. आता मात्र त्यांचा धीरच खचला. त्यांनी तिला सरळ हाताला धरूनच शेजारी बसवले. उमा म्हणाली "काकू खरं सांगू, तसं म्हणालं तर काहीच झालेलं नाहीये. पण सुख टोचत म्हणतात ना तसंच काहीसे झालंय नक्की. मुले मार्गी लागली, नवरा त्याच्या कामात व्यग्र आणि अचानक असं वाटायला लागलंय की सारं जग आपल्या आजूबाजूने धावतंय आणि मी मात्र एकाच जागेवर अडकले आहे. कुठे चुकतंय हो माझं ?" आता मात्र तिला हुंदकाही आवरत नव्हता. उमा म्हणाली, "आई आणि सासूबाईंना सांगितले तर त्या म्हणाल्या हे काय नवीनच हल्लीच्या मुलींचं असतं, अगं इतकं करतेस सगळयांसाठी, कोणाचं पान हालत नाही तुझ्याशिवाय, हे इतके सगळे व्याप मागे असताना,उगाच कशाला अति विचार करून स्वतःला शिणवायचे?" ‘‘सुहासला म्हणाले तर तो म्हणतो कसा "अगं उमा, तुझ्यासारखी आदर्श मुलगी, सून, बायको, आई शोधून

सापडायची नाही, माझाही धंदा उत्तम चालू आहे, पैसे भरपूर आहेत, गाडी दारात उभी आहे, तर तू मस्त मजा कर.'' काकू, नणंदेला आणि वहिनीला तर मी हे काही सांगूच शकत नाही कारण त्यांना तर माझा चक्क हेवाच वाटेल. त्यांना सांसारिक व्यापातून डोकं वर काढायला वेळ नाही आणि मी मात्र सगळयातून खऱ्या अर्थाने मोकळी झालेली असताना, मजा करायची सोडून स्वतःकडे लक्ष वेधण्यासाठी उगाच कण्हते आहे.''

"काकू खरं सांगू असं वाटतंय की सगळे म्हणतात तसे आदर्श बनण्यापेक्षा मी जर थोडा वेळ माझ्या स्वतःसाठी दिला असता ना तर माझ्यावर ही वेळ आली नसती. काय करायचंय हे शाब्दिक कौतुक घेऊन...." ती भिरभिरतच म्हणाली. "इतकी वर्ष मी आनंदाने सगळयांची वेळापत्रके सांभाळली, ज्याला जे आवडतं तसतसं करत गेले, त्यांचे अभ्यास, ऑफिस, जिम रुटीनस पण लक्षात ठेवली. कधीकधी स्वतःचा विचार पण बाजूला ठेवला. पण आता मात्र सगळे आपापल्या मार्गाने पुढे निघून गेले, ज्यांना मदत केली ते पण आभार मानून स्वतःच्या संसाराला लागले, मी मात्र इथेच पंख मोडलेल्या अवस्थेत....... मला मदतीला मात्र आज कोणीच दिसत नाहीये!!" एवढं बोलून तिच्या अश्रूंचा बांधच फुटला. उमाच्या डोळयातून घळघळणाऱ्या अश्रूंना अडवण्याचा प्रयत्न न करता सुरेखाताईंनी तिला थोडं मोकळं होऊन दिलं. सुरेखाताई शांतपणे तिच्यापाठीवर थोपटत राहिल्या. ती जरा शांत झाल्यावर त्यांनी तिला पाणी आणून दिले. त्या म्हणाल्या "उमा शांत हो जराशी, अगं तू समजतेस तशी तुझ्यावरच ही वेळ आलेली नाहीये. आपण सगळेचजण जगण्याच्या वाटेवर एकदातरी अशा तिठ्यावर येऊन उभे राहतो की जिथून कोणती वाट घ्यावी हे समजत नाही. या वाटेवर म्हणलं तर सगळेच एकटे असतात ग किंवा जरा आजूबाजूला बघितले तर आपल्याबरोबर अनेक पांथस्थही दिसतात. फक्त जरा दृष्टिकोनात बदल करावा लागतो इतकंच." सुरेखाताईंच्या आश्वासक हास्याने उमाला थोडी उभारी आली. सुरेखाताई म्हणाल्या "उमा, अगं सतत कामात असणं, धावत राहणं म्हणजेच जगणं नसतं. कधीकधी शांत आणि स्थिर होणंही महत्वाचं असतं. आता तुला वेळ मिळाला आहे ना तर त्याचा उपयोग कसा करायचा,हे तुझं तू परत एकदा ठरवण्याची वेळ आली आहे. या संधीचा छान फायदा करून घे.

तुला आठवतंय दोन वर्षांपूर्वी जेंव्हा आशिष, नेहा मुलांना घेऊन अमेरिकेला गेले. मी अगदी एकटी पडले होते. संध्याकाळ झाली की मुलांच्या आठवणीने अजूनच

दाटून यायचं. संध्यापण तिच्या संसारात अगदी बुडालेली असायची. किती वेळा माझ्यासाठी माहेरी येऊन राहील, अप्पा तरी माझ्याशी किती गप्पा मारणार!!" डोळे मिचकावून त्या बोलल्या.

"नेहाचा तर आमच्या काळजीने पायच निघत नव्हता. पण मुलांच्या प्रगतीमध्ये अडचण बनून मला तरी कसा आनंद मिळाला असता. मग मी स्वतःचीच समजूत घातली, स्वामींना हात जोडले आणि सांगितले तुम्हीच मला मार्ग दाखवा. अगं मला अध्यात्माची आवड असल्यामुळे संध्याकाळी शुभंकरोतीचे वर्ग चालू केले. आता बघ की नातवंडांनी घर भरून गेलंय. आमच्या पोळीभाजीवाल्या काकूंना हाताशी घेऊन आमच्या कोकणातल्या चवीचे खास खास पदार्थ बनवून इतरांना पुरवू लागले आहे. अगं माझे छंदच माझे इतके छान सोबती बनतील असे कधी मनातही आले नव्हते. आता मी इतकी समाधानी आहे म्हणून सांगू, असं वाटतंय की या वयात परत एकदा नवीन सूर गवसले आहेत. आता तू पण स्वतःला वेळ दे, स्वतःशीच गप्पा मार.

मनातल्या उमाला काय काय आवडतं ते तिला शेजारी बसवून विचार. तिचे पण लाड कर. तुझी तुलाच नवीन उमा सापडेल. आता हा वेळ नकारात्मक विचारात वाया घालवू नकोस. इतके दिवस आदर्श नाती तयार केलीस, आता उमाला आदर्श बनवायचा प्रयत्न कर. उठ कामाला लाग आणि या नवीन उमाला स्वतःच्या पायावर उभं कर." हे सगळं ऐकून आता मात्र उमाच्या डोळयातले अश्रूपण तिच्यासोबत किंचितसे हसले. तिने काकूंना घट्ट मिठी मारली. उमाला आता थोडा हुरूप आला. आता मात्र तिने काकूंचे बोलणे मनावर घेतले . ती आता स्वतःसाठी नवीन ध्येय शोधू लागली. उमा स्वतःसाठी पण थोडा वेळ काढू लागली, स्वतःचे वेळापत्रक मांडू लागली. वेळ मिळेल तेंव्हा डायरीत स्वतःचे विचार लिहू लागली. हे सगळे करताना काही माहिती लागली तर इंटरनेटवर गुगलगुरू तर जातीने हजर होताच.

आता तिला आपल्यातले काही गुण नव्याने लक्षात यायला येऊ लागले. तिने ठरवले की आपण अकाऊंटेबिलिटी / लाइफकोच व्हायचे. मुंबईमध्ये हल्ली या प्रोफेशनला खूप मागणी होती. उमाने या विषयाचा एक वर्षाचा डिप्लोमाही केला. उमाला आता खूप जणांना मदत करता येऊ लागली. कुणाला वजन उतरवण्यासाठी मदत हवी असायची. तर कुणाला त्यांच्या ध्येयपूर्तीसाठी कोणीतरी मैत्रीण किंवा मदतनीस हवी असायची. कधी कधी एखादी विद्यार्थिनी तिच्या अभ्यासासाठी उमाची मदत मागायची. आता ती एक व्यवसाय म्हणून अनेक जणांची वेळापत्रके आनंदाने सांभाळू लागली. हळूहळू तिने स्वतःचे युट्युब चॅनेल चालू केले.

हळूहळू फेसबुक इंस्टाग्रामवरही तिचे फॅन्स वाढू लागले. हे सगळे करताना तिला स्वतःचे एक आभाळ सापडले पंख पसरायला !!

आज जेंव्हा  उमाला शहरातल्या प्रतिषठित मंडळामध्ये प्रमुख पाहुणे म्हणून बोलावणे आले तेंव्हा ती आग्रहाने सुरेखाताईंना घेऊन गेली. विषय होता ‘‘तर सुख म्हणजे नक्की काय असते.’’ उमा जेंव्हा स्टेजवर भाषणासाठी उभी राहिली तेंव्हा तिची आणि समोर बसलेल्या सुरेखाताईंची सहज नजरानजर झाली. उमा त्यांच्याकडे बघत, प्रसन्न हसत आणि आत्मविश्वासाने म्हणाली की मला वाटते की सुखाच्या शोधात आकाशपाताळ एक करण्यापेक्षा सोप्पं म्हणजे स्वतःच्या शोधात निघा. स्वतःचेच मैत्र बना. स्वतःबरोबर आनंद घ्यायला शिका. ज्याक्षणी आपणच आपल्याबरोबर आनंदाने राहू शकतो ना, त्याक्षणी खरं सुख आपल्याला गवसू लागतं. आपण आरशासमोर उभे असताना स्वतःलाच शाबासकी देतो ना, ते असतं खरं सुख. आपण नेहमी आपल्याला कोण चांगलं म्हणतंय यासाठी जीवाचा आटापिटा करतो ना तेंव्हा कितीही उत्तमातले उत्तम करूनही आपण आत रितेच राहतो.  अस्वस्थ राहतो. जे करा मनापासून करा. त्यात स्वतःला झोकून द्या. नोकरी, लग्न, संसार, मुले आपल्याला हवी होती ना तर त्या संधींचा नात्यांचा  पुरेपूर आनंद घ्या. काही चुकले तरीही परत उमेदीने त्यात दुरुस्त्या करत पुढे चालत राहा. आयुष्यात जे काही निर्णय घ्याल तेंव्हा स्वतःला पण इतरांसारखेच महत्व द्या. म्हणतात ना युअर लाइफ मॅटर्स टू.” प्रेक्षकात टाळयांचा कडकडाट झाला. सुरेखाताईंचे मन आज आभाळाएवढे झाले होते. ...कस्तुरीमृगाला वेड लावणारा सुगंध आपल्यातच आहे याची जाणीव त्याला झाली होती!!

**दीपश्री गोडसे**

(पूर्वप्रसिध्दी : 'रंगदीप' २०१९)